# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.06.2024** **वारःशुक्रवार**

---

1.अठरावी लोकसभा अनेक बाबतीत ऐतिहासिक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

2.विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला प्रारंभ; गेल्या आर्थिक वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल दोन्ही सभागृहात सादर

3.आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराजांच्या पालखीचं आज देहूमधून प्रस्थान

आणि

4.टी 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत इंग्लंडवर दणदणीत मात करत भारताचा अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश

**राष्ट्रपती**

देशातल्या जनतेनं या सरकारला तिसऱ्यांदा निवडून देऊन, गेल्या दहा वर्षातल्या सेवा आणि सुशासनावर पसंतीची मोहोर उमटवली आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. अठराव्या लोकसभेच्या स्थापनेनंतर संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला त्यांनी संबोधित केलं. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकार आपल्या आकांक्षा पूर्ण करेल, असा जनतेला विश्वास वाटतो, असं संगत; अठरावी लोकसभा अनेक बाबतीत ऐतिहासिक असल्याचं त्या म्हणाल्या. पेपर फुटीप्रकरणी सरकार ठोस उपाययोजना करत आहे, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी केली जाईल, संसदेनं पेपरफुटीसंदर्भात कायदा बनवला आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्या दहा वर्षात भारताच्या अर्थव्यवस्थेनं अकराव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. आपण आता हरित युगाकडे वाटचाल करत आहोत, यासाठी सरकार आवश्यक ती पावलं उचलत आहे. हरित उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढवत असल्यामुळे रोजगार निर्मितीतही वाढ होईल असा विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला.

येत्या १ जुलैपासून देशात नवे फौजदारी कायदे लागू होणार आहे, याद्वारे आता दंडाऐवजी न्यायाला प्राधान्य दिलं जाणार आहे, असं त्या म्हणाल्या ..

**बाईट**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. काल राज्यसभेचं कामकाज सुरू झालं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहाला नवीन मंत्र्यांची ओळख करून दिली. त्यानंतर राज्यसभेचं कामकाजही दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**विधिमंडळ**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला कालपासून सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काल २०२३-२४ या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल दोन्ही सभागृहांच्या पटलावर मांडला. गेल्या आर्थिक वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेतली वाढ ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्याच्या स्थूल उत्पादनात ९ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची वाढ झाली होती. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ८ पूर्णांक ८ दशांश टक्के, तर कृषी क्षेत्रात सर्वात कमी १पूर्णांक ९

दशांश टक्के वाढ गेल्या आर्थिक वर्षात झाली. उद्योग क्षेत्राचा वाढीचा दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील, असं पूर्वानुमान आहे. गेल्या आर्थिक वर्षात राज्याचं सांकेतिक स्थूल उत्पादन ४० लाख ४४ हजार २५१ कोटी रुपये अपेक्षित आहे.

त्या आधीच्या आर्थिक वर्षात तुलनेत त्यात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. सांकेतिक स्थूल राष्ट्रीय उत्पादनात राज्याचा सरासरी वाटा सर्वाधिक आहे, असं या अहवालात म्हटलं आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ८ दशांश टक्के, महसुली तूट अर्धा टक्के आणि कर्जाचं प्रमाण राज्याच्या उत्पन्नाच्या १७ पूर्णांक ६ दशांश टक्के आहे. गेल्या आर्थिक वर्षात दरडोई राज्य उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल, असा राज्य सरकारचा अंदाज आहे. आधीच्या वर्षाच्या तुलनेत त्यात २५ हजार २१४ रुपयांची वाढ झाली आहे. दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात सहाव्या स्थानी आहे. परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र गेल्या आर्थिक वर्षातही पहिल्या स्थानी राहिला आहे.

विधान परिषदेत आर्थिक पाहणी अहवाल तसंच प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना तसंच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासंबंधीचे अध्यादेश सरकारनं पटलावर मांडले. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या ७ विधेयकांना राज्यपालांची संमती मिळाल्याचं जाहीर करण्यात आलं. दिवंगत आजी माजी सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून विधान परिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दरम्यान विधिमंडळाचं कामकाज सुरु होण्यापूर्वी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी, वीजबिल माफी, नैसर्गिक आपत्तींचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना मदत इत्यादी मुद्द्यांवर विरोधकांनी घोषणा दिल्या.

राज्य विधिमंडळाचं हे अधिवेशन आमच्यासाठी निर्धार आणि निश्चयाचं आहे. गेल्या दोन वर्षांत केलेल्या कामाच्या जोरावर पुन्हा महायुतीचं सरकार आणण्यासाठी आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत बातमीदारांशी बोलताना सांगितल.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान आमच्या सरकारनं दिलं. अमली पदार्थ प्रकरणात संपूर्ण राज्यभर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. अमली पदार्थांची विक्री होत असलेली बांधकाम उद्ध्वस्त करण्याच्या सूचना पुणे आयुक्तांना दिल्या आहेत. तरुण पिढी वाया जाऊ नये, यासाठी सरकार पावलं उचलत आहे, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली.

राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी तत्काळ कर्जमुक्ती योजना जाहीर करुन निवडणुकीपूर्वी त्याची अंमलबजावणी करावी अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलताना केली. मध्यप्रदेशाच्या धर्तीवर राज्यातही मुलींसाठी आर्थिक मदत देण्याची योजना राबवण्याचा सरकारचा विचार आहे. पण केवळ मुलींना नव्हे तर मुलांनाही मदत द्यावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

**विमानसेवा**

नांदेडहून पुणे आणि नागपूरसाठी कालपासून विमान सेवा सुरू करण्यात आली आहे. यापूर्वी ३१ मार्चपासून नांदेड- बंगळूर, नांदेड- दिल्ली-जालंधर, नांदेड- हैदराबाद, नांदेड - अहमदाबाद ही विमानसेवा सुरू आहे.

**तुकाराम महाराज पालखी**

आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराजांची पालखी आज दुपारी देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. पारंपरिक पद्धतीनं पूजाविधी, काल्याचं कीर्तन झाल्यानंतर निमंत्रित मान्यवरांच्या उपस्थितीत प्रस्थान सोहळा सुरू होईल. आज पालखी देहुतच इनामदार वाड्यात मुक्कामी असेल.

**ज्ञानेश्वर माउली**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहोळा उद्या अलंकापुरीतून पंढरीच्या दिशेनं प्रस्थान ठेवणार आहे; त्यासाठी हजारो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. उद्या पालखी सोहोळ्याचा मुक्काम आजोळघरी म्हणजे जुन्या गांधी वाड्यातच असेल. रविवारी ज्ञानेश्वर माऊली आणि तुकोबारायांची पालखी पुण्यात दाखल होत आहे; त्या पार्श्वभूमीवर पुण्यात पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. पालखी सोहळ्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे.

**पालख्या**

पंढरपूरला निघालेल्या संत मुक्ताबाईंच्या पालखीचं काल जालना जिल्ह्यात आगमन झालं. जिल्ह्यात ही पालखी दोन दिवस मुक्कामी राहणार आहे. शेगावच्या श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचं काल सकाळी परभणी शहरात आगमन झालं. तर हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव इथून पंढरपूरकडे निघालेली संत श्री नामदेव महाराजांची दिंडी काल हिंगोलीमध्ये पोहोचली; रामलीला मैदानावर संध्याकाळी पहिला रिंगण सोहळा उत्साहात पार पडला.

**नीट**

नीट गैरव्यवहारासंदर्भात राज्यात उघडकीला आलेल्या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्यात आली आहे. याप्रकरणी लातूरच्या दोन शिक्षकांना अटक झाली असून सीबीआयनं हाती घेतलेलं नीट संदर्भातलं हे चौथं प्रकरण आहे.

**आत्मसमर्पण**

गडचिरोली इथल्या दोन जहाल नक्षली महिलांनी काल पोलिसांपुढे शरणागती पत्करली.

बाली उर्फ रामबत्ती उर्फ झरिना नरोटे आणि शशिकला उर्फ चंद्रकला उर्फ सुनंदा उर्फ मनिषा उईके अशी या दोन नक्षलींची नावं आहेत. या दोघींवरही  प्रत्येकी ८ लाख रुपयांचं बक्षीस सरकारनं जाहीर केलं होतं.

**क्रिकेट**

टी 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं इंग्लंडवर दणदणीत मात करत अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. कर्णधार रोहित शर्माची अर्धशतकी खेळी आणि फिरकी गोलंदाजांनी केलेल्या भेदक माऱ्याच्या जोरावर इंग्लंडला धूळ चारत भारतानं तिसऱ्यांदा या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धडक मारली. पावसामुळे सामन्यात व्यत्यय आला होता; पण भारतीय फलंदाजांनी धडाकेबाज खेळी करत १७१ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर गोलंदाजांनी उर्वरीत कामगिरी पार पाडत इंग्लंडला सतराव्या षटकात १०३ धावातच गारद केलं. अक्षर पटेल आणि कुलदीप यादवनं प्रत्येकी तीन फलंदाज मोक्याच्या क्षणी बाद केले. अक्षर पटेलला सामनावीर घोषित करण्यात आलं. तत्पूर्वी काल सकाळी झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानवर ९ गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता उद्या भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान अंतिम सामना रंगणार आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या बहुतांश भागात पावसाची शक्यता असून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.